# महाराष्ट्र शासन
## विभागीय कार्यशाळा , आरोग्य सेवा (परिवहन), नाशिक.

| आरोग्य सेवा | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, सिव्हील हॉस्पिटल आवार, त्रंबकरोड, नाशिक.४२२००१ ई-मेल आयडी : smrwnasik@gmail.com |
|---|---|
| दूरध्वनी क्र. (०२५३) २९७०९५७ मो.न.९३७०२३२५८९ | |
| महत्वाचे व तातडीचे | जा.क्र.सेव्यविकाना/तांत्रिक विभाग/ऑईल दरपत्रक / 691 /२०२६ दि. 04/०२/२०२६. |


प्रति,

............................
............................
............................

विषय :- नाशिक विभागातील फोर्स ट्रॅव्हलर/ट्रॅक्स रुग्णवाहिका वाहनांचे प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती करीता आवश्यक ऑईल व लुब्रिकंटस खरेदी करणे साठी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द् करणे बाबत....

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/ प्र. क्र. ८२/भाग-III/उद्योग-४/ दिनांक ३०.१०.२०१५.
२) या कार्यालयाची मंजुर टिप्पणी दिनांक :- ०४.०२.२०२६.

महोदय,

सार्वजनिक आरोग्य विभागातील नाशिक विभागातील आरोग्य संस्थांकडील रुग्णवाहिका वाहनांचे प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती करीता खालील तक्त्यात नमूद ऑईल व लुब्रिकंटस दरपत्रकान्वये खरेदी करणेकामी खालील तक्त्यात नमूद ऑईल व लुब्रिकंटस खर्चाचे सर्व करांसह दर या कार्यालयास सादर करावयाचे आहेत. सदर खरेदी करणेबाबतचे सर्व कर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर दिनांक १३/०२/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत मोहोरबंद लिफाफयामध्ये व्यक्तिश: किंवा रजिस्टर / स्पीड पोस्टामार्फत या कार्यालयास सादर करावेत.

मोहोरबंद / सिलबंद लिफाफयावर “Force Traveller/Trax Engine Oil and Lubricants” असा स्पष्ट उल्लेख करावा. एक नग दरपत्रकान्वये खरेदी करणेकामी सर्व करांसह दर या कार्यालयास सादर करावे.

## — प्रपत्र —

| Sr. No. | Part Name | Required Quantity | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Engine Oil 10 W 30 API CK4 | 1260 Liters | |
| 2 | Gear Oil (ZX 80 W) | 275 Liters | |
| 3 | Differential Oil (85 W 140 GL 5) | 242 Liters | |
| 4 | Coolant (Fleet Guard Compleat EG 50:50 Premix ) | 180 Liters | |
| 5 | Adblue (Gulf ISO 22241) | 3380 Liters | |

कृ.मा.प.

## दरपत्रके सादर करण्यासाठी दिनांक / वेळ आणि ठिकाण :

| अ. क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | या कार्यालयाचे सुचना फलकावर दरपत्रके सादर करणेसाठीचा नमुना प्रपत्र उपलब्ध असणे | दि. ०४ फेब्रुवारी २०२६ ते १३ फेब्रुवारी २०२६ |
| २ | दरपत्रके सादर करण्यासाठीची मुदत | दि. १३ फेब्रुवारी २०२६, वेळ - दु. १.०० पर्यंत |
| ३ | दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ | दि. १३ फेब्रुवारी २०२६, वेळ - दु. ३.०० वाजता |
| ४ | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), सिव्हील हॉस्पिटल आवार, त्रंबकरोड, नाशिक - ४२२००१ |

प्राप्त संस्थांची दरपत्रके उघडण्याची वेळ ही दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता असेल व सदर दरपत्रके उपस्थित असलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनीधींचे समक्ष उघडण्यात येतील.

## दरपत्रके सादर करणेबाबतच्या अटी व शर्ती :

१) पुरवठादार संस्थेकडून प्रस्तावित पुरवठा होणारे ऑईल व लुब्रिकंटस हे उत्पादक कंपनीस पुरवठा करणारे असावे.
२) पुरवठादार संस्था अधिकृत असले बाबत उत्पादक कंपनीचे अधिकृत पुरवठादार प्रमाणपत्र सादर करावे.
३) दरपत्रके ही संस्थेच्या लेटरहेडवर असावीत तसेच नमुना प्रपत्रामध्ये दर नमूद करुन सदरील लेटरहेड हे सही व शिक्क्यासह या कार्यालयास सादर करावीत.
४) दरपत्रकावर GST क्रमांक नमुद करावा.
५) दरपत्रकासोवत पुरवठादार संस्थेचे आधार कार्ड, पॅन कार्डची छायांकीत प्रत व मुळ रद्द केलेला धनादेश (Original Cancelled Cheque) सादर करण्यात यावा.
६) शासकिय नियमानुसार आवश्यक TDS कपात करण्यात येईल.
७) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे किरकोळ विक्री किंमतीपेक्षा (एम.आर.पी) पेक्षा जास्त नसावेत.
८) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.
९) खाडाखोड असलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.
१०) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.
११) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल.
१२) कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा तसेच खरेदी प्रक्रिया रदद् करण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्यसेवा (परिवहन) नाशिक यांचा राहिल.
१३) प्रशासकिय अथवा तांत्रिक कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब / उशीर झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
१४) दरपत्रकातील दर हे सद्यस्थितीत लागू असलेल्या सर्व **करांसहित** असलेले दरपत्रक सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), नाशिक या नावे सिलबंद लिफाफयात पाठवावीत.

(.....................)
सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा
आरोग्य सेवा (परिवहन),
नाशिक.

**प्रत /- नोटीस बोर्ड**

# प्रपत्र - अ

## निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमुना

मी/आम्ही / आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की,

१) आमचा खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधांचा संघर्ष नाही

२) सदर कामासाठी ईच्छुक असून त्यासाठी एकल दरपत्रक सादर केलेले आहे.

३) दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

४) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे किरकोळ विक्री किंमतीपेक्षा (एम.आर.पी) पेक्षा जास्त नाहित. सर्व संभाव्य खर्चासह आणि करांसह आहेत.

दिनांक :- / / २०२६

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का